divyamarathi.com



इंजिनिअरिंगच्या २१ विद्यार्थ्यांना फिन आयक्यूतर्फे पाच लाखांहून अधिक पॅकेजच्या प्लेसमेंट देण्यात आल्या. यातील विद्यार्थ्यांसमवेत प्राध्यापक वृंद.

**प्लेसमेंटची ऑफर** • के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे उल्लेखनीय यश

# इंजिनिअरिंगच्या २१ विद्यार्थ्यांना फिन आयक्यूचे ५ लाखांहून अधिक पॅकेज

**प्रतिनिधी** | नाशिक

अभियांत्रिकीच्या अखेरच्या वर्षातील विद्यार्थ्यांचे शेवटचे सत्र सध्या सुरू असून महाविद्यालयांतच विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन केले जात आहे. आयटी, इन्फ्रास्ट्रक्चर, हॉस्पिटल यांसह वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंत कंपन्यांकडून प्लेसमेंट ड्राइव्ह घेतले जात असून यात विद्यार्थ्यांना लाखो रुपयांच्या पॅकेजेसच्या ऑफर मिळत आहे. के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील २१ विद्यार्थ्यांची पुणे येथील फिन आयक्यू कंपनीकडून निवड करण्यात आली असून त्यांना वार्षिक ५ लाख ३० हजार रुपयांची ऑफर मिळाली आहे. प्लेसमेंट ड्राइव्हच्या माध्यमातून सध्या विद्यार्थ्यांना चांगल्या कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी मिळत आहेत.

के. के. वाघ इंजिनिअरींग कॉलेजसमध्ये सुरू असलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच २१ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली आहे. पुणे येथील फिन आयक्यू कंपनीकडून विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस इंटरव्ह्यू घेण्यात आला. प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी विद्यार्थ्यांना मुलाखती विषयी मार्गदर्शन केले. मिलिंद कुलकर्णी यांनी प्री-प्लेसमेंट विषयी विद्यार्थ्यांशी चर्चा केली. यामध्ये त्यांनी कंपनीविषयी माहिती, मुलाखतीची प्रक्रिया तसेच पॅकेज इत्यादी माहिती दिली. या मुलाखतीमध्ये प्रथमतः ऑनलाइन टेस्ट त्यानंतर ग्रुप डिस्कशन आणि ॲक्टिव्हिटीनंतर वैयक्तिक मुलाखत फेरी घेण्यात आली.

अखेरच्या फेरीतून २१ विद्यार्थ्यांची निवड झाली असून कंपनीने ५ लाख ३० हजाराचे पॅकेज देऊन ऑफर लेटर दिले. विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोकभाई मर्चंट, समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.एन.नांदूरकर, विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने, डॉ. पी. डी. भामरे, डॉ. डी. एम. चांदवडकर, प्रा. एम. बी. मुरगकर, डॉ. बी. ई. कुशारे, प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## या विद्यार्थ्यांची करण्यात आली निवड...

अभिषेक सातभाई, अक्षय चव्हाण, अनुजा दिक्षीत, अर्थव परशरे, प्रतिक सावंत, प्रतिक्षा गायकवाड, राघव पटेल, रश्मी पुरंदरे, रोहित तुस्लियानी, साकेत सबनीस, संकेत लेखवाणी, सायली जाधव, सुमित थोरात, वेदीका मुजुळे, वृषाली सोब्रा, वृषाली गील, प्रनिता गायकवाड, अंजली पाटील, मेघना राजोळ, शुभम दिवाटे या विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळाली.